# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ९८ वा गुरूवार दि.१९ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# औसा येथील तक्षशिला बुद्ध विहार विकास कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन

## बुद्ध विहाराच्या माध्यमातून गौतम बुद्धांचे शांतता आणि समानतेचे विचार समाजापर्यंत पोहोचतील – केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

औसा :– औसा येथील तक्षशिला बुद्ध विहार विकास कामांचे लोकार्पण करताना अतिशय आनंद होत आहे. या बुद्ध विहाराच्या माध्यमातून गौतम बुद्धांचे शांतता आणि समानतेचे विचार समाजापर्यंत पोहचण्यास मदत होणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सांगितले. औसा येथील तक्षशीला बुद्धविहार विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजननिमित्त विजय मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ना. आठवले बोलत होते. राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आमदार अभिमन्यू पवार, माजी आमदार बसवराज पाटील, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर– घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, औसा–रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, भन्ते पय्यानंद, औसा नगरपरिषद मुख्याधिकारी श्री. शिंदे यांच्यासह तक्षशिला बुद्ध विहार समितीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. गौतम बुद्धांच्या विचारांचा अंगीकार करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील तळागाळातील लोकांच्या कल्याणासाठी प्रयत्न केले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशातील प्रत्येक व्यक्तीला समानतेची वागणूक मिळावे, अशी त्यांची भूमिका होती. सर्व जाती–धर्मांच्या कल्याणाचा विचार करून त्यांनी भारतीय राज्यघटना तयार केली, असे ना. आठवले म्हणाले. औसा परिसरात आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नातून सर्व समाज घटकांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात कामे झाली आहेत.






जवळपास ११० गावांमधे त्यांनी समाज भवन बांधकामासाठी सहाय्य केले असून औसा येथील तक्षशीला बुद्ध विहारासाठी २ कोटी रुपये निधी त्यांनी दिला आहे. त्यामुळे गौतम बुद्धांच्या विचारांचा प्रसार होवून समाजाच्या विकासाला हातभार लाभेल, असे ना. आठवले म्हणाले. औसा येथील बुद्ध विहार आणि येथे होत असलेल्या विविध कामांमुळे याठिकाणी येणाऱ्या उपासकांना चांगल्या सुविधा निर्माण होणार असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यावेळी म्हणाले. तक्षशीला बुद्ध विहार येथील विविध कामांसाठी २ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याठिकाणी स्पर्धा परीक्षा अभ्यासिका सुरू करून समाजातील युवकांना स्पर्धा परीक्षा पूर्वतयारीसठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासह विविध विकास कामांसाठी निधी देणार असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले. तसेच सर्व समाजाला सोबत घेऊन विकास कामे करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. माजी मंत्री बसवराज पाटील यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात भिख्खू संघाच्या वतीने आमदार अभिमन्यू पवार यांना गौतम बुद्धांची मूर्ती आणि मानपत्र देण्यात आले. भन्ते पय्यानंद यांनी मानपत्रचे वाचन केले. भन्ते सुमेधजी नागसेन, भन्ते नागसेन बोधी, भन्ते धम्मसार, तक्षशिला बुद्ध विहार ट्रस्टचे अशोक बनसोडे, राजेंद्र बनसोडे यावेळी उपस्थित होते. माजी नगरसेविका कल्पना डांगे यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्रारंभी औसा येथील तक्षशिला बुद्ध विहार येथील टप्पा–१ मधील विकास कामांचे लोकार्पण आणि टप्पा २ मधील विकास कामांचे भूमिपूजन केंद्रीय सामजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. तक्षशिला बुद्ध विहार विकास कामांच्या पहिल्या टप्प्यात ध्यानधारणा केंद्र इमारतीचे बांधकाम व नूतनीकरण, प्रवेशद्वार ते ध्यानधारणा केंद्रापर्यंत पायऱ्या, तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीसाठी चबुतरा, विद्युतीकरण आदी कामांचा सामावेश आहे. तसेच याठिकाणी प्रवेशद्वार, संरक्षण भिंत, उद्यान विकसित करणे आदी कामे दुसऱ्या टप्प्यात होणार आहेत.

# कालिदास माने कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानीत

## गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

लातूर : येथील दयानंद सभागृहात मंगळवारी (दि. १७ सप्टेंबर) मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, जिल्हा शाखा लातूरच्या वतीने आयोजित महाराष्ट्र भूषण पुरस्कार–२०२४ सोहळ्यात सानेगुरुजी शैक्षणिक संकुलाचे संस्थापक तथा महाराष्ट्र राज्य शिक्षक प्रतिनिधी सभेचे अध्यक्ष कालिदास माने यांना शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभ हस्ते सन्मानीत करण्यात आले. याप्रसंगी मंचावर खा. डॉ. शिवाजी काळगे, पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे(दिल्ली), मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी, प्रा. विठ्ठल कांगणे, ह.भ.प. अनंत माने महाराज, जेष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, जिल्हाध्यक्ष अशोक देडे आदी उपस्थित होते. कालिदास माने हे शिक्षण आणि शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी चळवळीतून उदयास आलेले नेतृत्व आहे. शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरत लातूर जिल्हाच नव्हे तर मुंबई, नागपूर आदि ठिकाणी आंदोलने, मोर्चे, उपोषणे वेळ प्रसंगी अधिकाऱ्यांच्या खुर्चीला हार घालून प्रशासनास जागे केले आहे. शिक्षणाचा हक्क कायद्यातील तरतुदीसाठी एक लाख शिक्षकांच्या स्वाक्षरी घेऊन राष्ट्रपतींना पाठवले होते. महाराष्ट्र प्रदेश शिक्षक प्रतिनिधी सभेच्या माध्यमातून शिक्षकांना प्रोत्साहित करण्यासाठी गुणवंत शिक्षक व शाळांना जिल्हा निहाय पुरस्कार सोहळे घेत सन्मानित केले आहेत. शिक्षकांना न्याय व हक्क मिळवण्यासाठी रस्त्यावरील लढाई सोबतच कायदे मंडळात म्हणजेच विधान परिषदेत जाण्यासाठी २०१६ व २०२२ ची मराठवाडा शिक्षक मतदार संघात उमेदवार म्हणून थांबण्याचे धाडस करून ८ जिल्हे व ७६ तालुके पिंजून काढले होते. शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी लढत लढत शिक्षकांना रोजगार व गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे म्हणून साने गुरुजी च्या नावाने सानेगुरुजी शैक्षणिक संकुल उभारत साधारणता २०० शिक्षकांना रोजगार व हजारो विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याचे काम करत आहेत. याप्रसंगी शैक्षणिक, राजकीय, उद्योग, सहकार, आरोग्य,क्रीडा, प्रशासन, आदि क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले हा पुरस्कार मिळाल्याबद्दल राजकीय सामाजिक क्षेत्रातील तसेच मॉर्निंग वाक ग्रुप, संस्थाचालक संघटना, शिक्षक संघटना, साने गुरुजी शैक्षणिक संकुल, शिक्षक, मुख्याध्यापक आदी सर्वच क्षेत्रातून अभिनंदन केले.




# परिस्थितीवर मात करायची आसेल तर पुस्तकाला गुरू माना..! उत्तम तरकसे

पुस्तकासारखा जगात सर्वात मोठा गुरु कोणी नाही..! आणि म्हणून तर सर्व प्रथम विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुस्तकाला गुरुस्थानी मानले आगदी तथागत भगवंत गौतम बुद्ध, संत कबीर, महात्मा ज्योतिराव फुले इत्यादी पुस्तकांचे वाचेन केले त्यातुन त्यांनी खरा इतिहास जानुन घेतला आणि या युगपुरुषांना त्यांनी गुरुस्थानी मानले वाचन आधीक लिखाण हाच त्यांच्या मनोमनी ध्यास होता आणि आपल्या समाजाला मुलमंञ दिला शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा..! आणि म्हणून तर आज सारे विश्व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सिंबालऑफ नॉलेज म्हणून ओळखतात, सार्या जगात एक थोर कायदेपंडित म्हणून त्यांचे नाव आहे. आणि म्हणून आजच्या युवकांनी पुस्तक हेच माझा खरा मित्र आहे हे जे मानतील ते जगावर आपले वर्चस्व सिद्ध करतील..! आसे प्रतिपादन प्रसिद्ध कवी – साहित्यिक आयु. उत्तम तरकसे यांनी पुस्तकांचे महत्व पटवून सांगीतले.

नवी मुंबई / के. एच. हनवते : (पनवेल) कोकण मराठी साहित्य परिषद शाखा पनवेल यांच्या वतीने तीन पुस्तकाच्या प्रकाशन सोहळा प्लॉट नंबर २९ से.०२ पनवेल येथील कर्नाटक संघच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. ऐ के शेख (जेष्ठ गजलकार) मा. सुधीर शेठ (अध्यक्ष रायगड जिल्हा कोमसाप) मा. ऑड सुनिता जोशी (ज्येष्ठ साहित्यिका) मा. प्रमोद कर्नड (ज्येष्ठ साहित्यिक) मा. जगदीश संसारे (रेडिओ जॉकी) मा. श्री रोहिदास पोटे (अध्यक्ष कोमसाप पनवेल) मा प्रा डॉक्टर सूर्यकांत परकाळे (सिकेटी कॉलेज खांदेश्वर) असे प्रमुख अतिथी यांच्या हस्ते दोन काव्यसंग्रह व एक कथासंग्रह असे एकूण तीन पुस्तकांचे प्रकाशन सोहळा मोठ्या दिमाखात साजरा झाला. सदर कार्यक्रमास ऐनवेळी वेळात वेळ काढून महाराष्ट्र राज्य शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक व विचारवंत मा उत्तम दासु तरकसे (आसरडोकर) हे कार्यक्रमास हजर झाल्याने तीन पुस्तकांचे लेखक कवी श्री सुभाष कुडके, श्री शिवाजी मोठे ,श्री नागनाथ डोलारे, यांच्या हस्ते मा. श्री तरकसे यांचा सन्मान करून त्यांना आपले मनोगत व्यक्त करण्यास आग्रह करण्यात आल्याने तरकसे यांनी पुस्तकाबाबत आपले विचार मांडताना मानसाने जीवन जगताना एक गोष्ट लक्षात ठेवावी. पुस्तक व परिस्थिती यासारखा जगात सर्वात मोठे गुरु नाही कारण जीवन जगावे कसे आणि जगताना वागावे कसे हे पुस्तक व परिस्थिती शिवाय दुसरं कोणीच शिकू शकत नाही. असे मोलाचे मार्गदर्शन केले सदर कार्यक्रमाचे सर्व प्रमुख पाहुण्यांनी विचार मांडत पुस्तकात विषयी विचार मांडत श्रोत्यांना मार्गदर्शन केले तसेच सदर कार्यक्रमास उपस्थित साहित्यिक रसिक प्रेक्षक व उपस्थित पाहुणे यांचे आभार मानून सर्व उपस्थितांनी स्नेह भोजनाचा आस्वाद घेवुन आयोजकांनी सर्वांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा दलीत बहुजनांच्या सन्मानासाठी होता – डॉ सुरेश वाघमारे

लातूर :–डॉ बाबासाहेब आंबेडकर तडवळे येथे महार मांग वतन परिषदेसाठी आले होते त्या वेळी या कार्यकर्त्यांशी संवाद करताना म्हणाले होते अरे मला तर देव विचारील पणं दलीत आदिवासी आणि बहुजन समाजाला सन्मान मिळाला पाहिजे यासाठी माझा लढा आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ सुरेश वाघमारे यांनी केले सम्यक समाज संघाच्या वतीने आयोजित सन्मान पुरस्कार वितरण कार्यक्रमात केले डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या या भूमिकेतून (१६ सप्टेंबर)सम्यक संघाच्या वतीने ज्यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे आशा दलीत बहुजन समाजातील मान्यवर व्यक्तीचा सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले यामध्ये प्रामुख्याने कॅप्टन डॉ बाळासाहेब गोडबोले आदर्श शिक्षक पुरस्कार (२०२३–२४) विजेत्या अनिता खडके, शिवरत्न पत्रकार पुरस्कार विजेते अशोक हनवते संपादक– दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर , अरुण गडेराव (प्रबंधक इन्शुरन्स कंपनी) ड लहू सुरवसे( अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर ऍडव्होकेट फोरम) इ ना प्रातिनिधिक स्वरूपात सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले या प्रसंगी प्रो. डॉ नारायण कांबळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सम्यक समाज संघाचे अध्यक्ष ड मंचकराव डोणे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना या कार्यक्रमाची भूमिका विषद केली यावेळी सन्मान पुरस्कार प्राप्त डॉ बाळासाहेब गोडबोले, श्रीमती अनिता खडके,ड लहू सुरवसे,अरुण गडेराव, अशोक हनवते तसेच प्रकाश घादगिने आणि आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी ड राजेंद्र लातूरकर,प्रा एम बी पठाण, वनाधिकारी साबळे, डॉ राहुल डोंबे, डॉ अक्षय कुमार धाराशिवे, शैलजी घाडगे, विलास दुधाळे, सोनेराव माने, कुलकर्णी आणि लामतूरे इ उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्र संचलन मंचक डोणे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राचार्य संजय गवळी यांनी केले





### माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख – यांच्याकडून हुतात्मा स्मारकस्थळी जाऊन मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील हुतात्म्यांना विनम्र अभिवादन.

लातूर/ प्रतिनिधी :– मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दि.१७ सप्टेंबर मंगळवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथील हुतात्मा स्मारकस्थळी जाऊन मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील हुतात्म्यांना पुष्पहार अर्पण करून आपल्या सहकार्यासमवेत विनम्र अभिवादन केले. दरम्यान यावेळी त्यांनी या ठिकाणी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला व बाल गोपालांच्या समवेत छायाचित्रे काढली. यावेळी विलास सह. साखर कारखाना व्हा.चेअरमन– रवींद्र काळे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष– ऍड.किरण जाधव, माजी महापौर–प्रा. स्मितताई खानापूरे, माजी नगराध्यक्ष–लक्ष्मण कांबळे, संतोष देशमुख, माजी नगरसेवक–दत्ता लोखंडे, सेवादलाचे सुपर्ण जगताप,इम्रान सय्यद, डॉ बी. आर. पाटील,शाम जैन,राहुल देशमुख,सुनील गायकवाड,पांडुरंग देडे रहीम शेख,चंद्रकांत धायगुडे, पिराजी साठे यांच्यासह लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी,सदस्य उपस्थित होते.




दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# राजीनाम्याचे अस्त्र

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी कारावासातून जामिनावर सुटका झाल्यानंतर कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना आपण मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार असल्याची घोषणा केली. एवढेच नाही तर मनीष सिसोदिया हेसुद्धा या पदावर बसणार नाहीत, असेही त्यांनी या मेळाव्यात स्पष्ट केले आहे. केजरीवाल यांच्या या घोषणेबाबत उलटसुलट मते जरी व्यक्त होत असली, तरी विद्यमान राजकीय परिस्थितीमध्ये केजरीवाल यांचा हा राजीनामा एक अस्त्र म्हणूनच विचारात घ्यावा लागणार आहे. गेल्या सुमारे एका वर्षाच्या कालावधीमध्ये दिल्लीत सत्तेवर असलेल्या आम आदमी पक्षाच्या विविध नेत्यांना विविध कारणांनी कारावास भोगावा लागला आहे. अशा परिस्थितीमध्ये सत्तेवर राहून भ्रष्टाचाराची टीका झेलण्यापेक्षा पुन्हा एकदा जनतेच्या मैदानात जाऊन कौल मागण्याची ही आम आदमी पक्षाची रणनीती आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या दोन महत्त्वाच्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले असल्याने आणि काही काळ दोघांनीही कारावास भोगला असल्यामुळे जामिनावर सुटका झाल्यानंतर या पदावर कार्यरत राहून कारभार करणे उचित नाही त्यामुळेच केजरीवाल यांनी ही भूमिका घेतली आहे. दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीला आणखी कालावधी बाकी असला तरी महाराष्ट्र विधानसभेसोबतच दिल्ली विधानसभेची निवडणूक घेण्याचे एक प्रकारे आव्हानही त्यांनी केंद्रातील भाजप सरकारला दिले आहे. वर्षभराच्या कालावधीमध्ये दिल्लीत घोटाळ्याच्या निमित्ताने आम आदमी पक्षाची जी बदनामी झाली आहे त्याचा परिणाम जर कमी करायचा असेल तर सत्तेपासून दूर राहून जनतेच्या मनात सहानुभूती निर्माण करणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून केजरीवाल यांनी राजीनामा अस्त्र उपसले आहे. अर्थात, या प्रकरणी केजरीवाल यांना सर्वप्रथम जेव्हा अटक झाली होती तेव्हा त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला नव्हता उलट तुरुंगातूनच मी मुख्यमंत्रिपद राबवू शकतो, असेही त्यांनी सांगितले होते. तुरुंगात असताना जर त्यांनी राजीनामा दिला असता, तर एक प्रकारे ती गुन्ह्याची कबुली झाली असती.याच भूमिकेतून त्यांनी जामिनावर सुटका झाल्यानंतर राजीनामा देण्याचा निर्णय घेतला असावा. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना जामीन देताना ज्या विविध अटी घातल्या आहेत त्या पाहता मुख्यमंत्रिपद राबवताना त्यांना अनेक अडचणी येणार आहेत. अशा प्रकारच्या अटींनी बांधलेल्या मुख्यमंत्रिपदाला कोणताही अर्थ नसल्यानेच त्या कारणानेसुद्धा त्यांनी हे पद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपद सोडल्यानंतर आणि हे पद मनीष सिसोदिया यांनासुद्धा मिळणार नसल्याची घोषणा त्यांनी केल्यानंतर आता हे मुख्यमंत्रिपद कोणाला मिळणार याबाबतही चर्चा सुरू झाली आहे.आम आदमी पक्षामध्ये असे अनेक सक्षम नेते असल्याने कोणत्याही नेत्याची या पदावर नियुक्ती होऊ शकते. पण त्याचवेळी अशा निर्णयामुळे आम आदमी पक्षांमध्ये एक समांतर सत्ताही निर्माण होणार आहे हा धोकाही केजरीवाल यांनी लक्षात घ्यायला हवा. जर त्यांनी मागणी केल्याप्रमाणे महाराष्ट्र विधानसभेसोबत दिल्ली विधानसभेची निवडणूक झाली नाही, तर केजरीवाल यांच्या जागेवर मुख्यमंत्रिपदी राहणारा नेता भविष्यातही या पदासाठी दावेदार असू शकतो. भारतातील अशा प्रकारच्या राजकारणाचा विचार करता अशा कमी कालावधीसाठी जेव्हा एखाद्या नेत्याची मुख्यमंत्रिपदी नियुक्ती केली जाते तेव्हा त्यानंतर त्याच्या महत्त्वाकांक्षेला धुमारे फुटतात आणि पक्षामध्ये अंतर्गत संघर्ष सुरू होतो.बिहार, झारखंड अशा अनेक राज्यांनी अशा घटना सिद्ध केल्या आहेत. साहजिकच राजीनाम्याचे हे अस्त्र उपसताना केजरीवाल यांना या राजकीय धोक्याचीही जाणीव असायला हरकत नाही. अर्थात, विद्यमान राजकीय परिस्थितीमध्ये निवडणुकीत पुन्हा एकदा सत्तेवर येऊन मतदारांचा विश्वास मिळवून आम आदमी पक्षावर जो भ्रष्टाचाराचा आरोप झाला आहे तो धुऊन काढण्याचे कामच केजरीवाल यांना प्राधान्याने करावे लागणार आहे. मतदारांनी पुन्हा एकदा त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला, तर केजरीवाल, सिसोदिया किंवा त्यांच्या इतर नेत्यांवर करण्यात आलेले आरोप चुकीचे होते असा समज आपोआपच निर्माण होईल, याची जाणीवही केजरीवाल यांना आहे.अर्थात, दिल्ली विधानसभेमध्ये फक्त भाजपच केजरीवाल यांचा राजकीय विरोधक असे आहे असे नाही, तर काँग्रेस पक्षसुद्धा दिल्लीमध्ये 'आप'ला विरोधच करत राहिला आहे. राजीनामा अस्त्र उपसून पुन्हा एकदा जनतेच्या मैदानात जाताना त्यांना हा राजकीय विरोधही लक्षात घ्यावा लागणार आहे. भाजप हा कथित मद्य घोटाळ्याचा विषयच विधानसभेमध्ये प्राधान्याने समोर आणणार, हे गृहीत आहे. साहजिकच दिल्ली विधानसभेची आगामी निवडणूक अतिशय चुरशीची ठरणार आहे. राजीनामा देण्याची घोषणा करून केजरीवाल यांनी एक प्रकारे भाजप सरकारलाही आव्हान दिले आहे.आम्ही कोणतीही चुकीची गोष्ट केली नसल्याने आम्ही कोणत्याही वेळी मतदारांना सामोरे जायला तयार आहोत हेच त्यांना या भूमिकेतून सुचवायचे आहे. अर्थात मतदारांना त्यांची ही भूमिका मान्य असणार आहे की नाही हे मात्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर स्पष्ट होणार आहे. सध्या तरी केजरीवाल आणि सिसोदिया हे महत्त्वाचे नेते सत्ताकेंद्रापासून दूर राहणार असल्यामुळे दिल्लीची सत्ता आता कोणत्या नेत्याच्या हातात जाणार हा विषय महत्त्वाचा ठरणार आहे.

# पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्याचा 'संकल्प'

जैवविविधतेच्या दृष्टीने जागतिक पातळीवर संवेदनशील मानल्या गेलेल्या पश्चिम घाटाचा कोकण हा महत्त्वाचा हिस्सा आहे. बिबटे, अस्वले, रानडुकरे, कोल्हे, तसेच विविध प्रकारच्या पक्षी आणि फुलपाखरांमुळे या प्रदेशाला कमालीची नैसर्गिक विविधता प्राप्त झाली आहे. पण ही नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट होण्याचे संकट जगाच्या अन्य भागाप्रमाणे कोकणातही उभे ठाकले आहे. मात्र त्यापुढे हार न मानता रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुख येथील 'सह्याद्री संकल्प सोसायटी'चे कार्यकर्ते गेली सुमारे दोन दशके या क्षेत्रात व विविध आघाड्यांवर झपाटून काम करत आहेत. त्याचा आगामी पिढ्यांना चांगलाच फायदा होणार आहे. ह्याद्री संकल्प सोसायटी' गेल्या १७ वर्षांपासून देवराया जोपासणे आणि जंगलवाढ होण्यासाठी काम करीत आहे. या संस्थेने जंगल वाढीसाठी कोणते घटक कारणीभूत आहेत, याचा सर्वप्रथम अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्यावेळी असे लक्षात आले की, जंगलातील शेतकरी म्हणून ओळखला जाणारा धनेश (हॉर्नबिल) पक्षी जंगल वाढीसाठी मोठा हातभार लावत आहे. याविषयी 'सह्याद्री संकल्प सोसायटी'ने धनेशच्या प्रजाती शोधून काढून त्याच्यावर संशोधन करण्यास सुरुवात केली. मोठ्या प्रमाणात होत असलेल्या जंगलतोडीमुळे धनेश पक्ष्यांच्या ढोल्या असलेली झाडेच नष्ट झाली आहेत. त्यामुळे धनेश पक्ष्याचे अस्तित्वात धोक्यात आले आहे. कोकणात धनेश पक्ष्याच्या चार प्रजाती आढळतात. त्यातील मोजकेच पक्षी आता शिल्लक राहिले आहेत. हा पक्षी मुख्यत्वे फलाहारी आहे. तो वड, पिंपळ, उंबर, धेड उंबर, करवत, पिंपरी, नांदरुख अशा वृक्षांची फळे खातो. या वृक्षांची फळे खाऊन त्यांच्या बिया आपल्या विष्ठेमार्गे सर्वदूर पोहोचवत असतात. धनेश पक्ष्याच्या पचनसंस्थेत होणाऱ्या अभिक्रियेमुळे अनेक वृक्षांच्या कठीण कवचांच्या बियांचे कवच मऊ होऊन सहज रुजतात. त्यामुळे बऱ्याच वृक्ष प्रजाती या धनेश पक्ष्यांवर अवलंबून असतात. धनेश पक्ष्याचा जीवनक्रम धनेश पक्षी दहा ते वीसच्या संख्येत थव्याने फिरत असतात. विणीच्या हंगामाच्या वेळी या पक्ष्यांचे थवे एका जागी जमतात. तेथे ते आपल्या जोड्या जुळवितात. या जोड्या आयुष्यभर आपली साथ देत असतात. धनेश पक्षी स्वत:च्या संरक्षणासाठी वृक्षावरील ढोल्या शोधून तेथेच आपले वास्तव्य करतात. धनेश मादीला अंडी घालण्यासाठी योग्य आणि सुरक्षित ढोली मिळाली की, मादी तीन ते चार महिने स्वत:ला बंदिस्त करून घेते. मादी आपली लाळ, विष्ठा, फळांचा गर, माती यांचे मिश्रण करून ढोली लिपून घेते. आपली चोच बाहेर राहील एवढी जागा ठेवून स्वत:ला बंदिस्त करून घेते. यादरम्यान मादीला फळ आणून देण्याचे काम नर धनेश करत असतो. ९० दिवसांच्या कालावधीत मादी आपल्या पिल्लांना जन्म देत असते. मात्र आता मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या जंगल तोडीमुळे या धनेश पक्ष्याच्या प्रजाती नष्ट होऊ लागल्या आहेत. धनेश पक्ष्याचे प्रजनन करण्यासाठी ढोल्या असणारे वृक्ष नसल्याने आणि खाद्या वनस्पतींची कमी यामुळे धनेश पक्ष्याची नवी पिढी वाढण्यास अडथळे निर्माण झाले आहेत. जंगले वाढवायची असतील तर धनेश पक्ष्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन २००७ पासून 'सह्याद्री संकल्प सोसायटी'ने यावर काम करण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या दैनंदिन हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी डिजिटल कॅमेरे झाडावर बसवले जातात. त्यांच्या विष्ठेपासून मिळणाऱ्या बिया एकत्रित करून त्यातून रोपवाटिकेची संकल्पना पुढे आणली. धनेश पक्ष्याला खाद्यासाठी लागणारी झाडे पुनर्निर्माण करण्यासाठी एक नर्सरी उभारली. त्यासाठी पक्ष्याच्या विष्ठेमधून मिळणाऱ्या बिया गोळा करून आणणे अवघड काम या सोसायटीने सुरू केले. त्यासाठी धनेश बीज संकलन समूहाची निर्मिती करण्यात आली. सद्या:स्थितीत गाजरा, कडू कवट, जंगली बदाम, जायफळ, सुरमाड, पिंपळ, मायफळ, उंबर, वड, करवत, चारोळी, चांदफळ, कूकर, सरडोळ अशा खाद्या वृक्षांच्या वनस्पतींची रोपे तयार करण्याचे काम या संस्थेच्या नर्सरीतून केले जात आहे. ज्या ठिकाणी धनेश पक्ष्याच्या ढोल्या आहेत, त्या ठिकाणच्या परिसरात रोपे लावून झाडांची घनता वाढविण्याचे काम सह्याद्री संकल्पनेने हाती घेतले आहे. याबरोबर कृत्रिम ढोल्या बनवून धनेश पक्ष्याचे संवर्धन करण्याचे काम 'सह्याद्री संकल्प सोसायटी'कडून करण्यात येत आहे. कोकणातील काही ठिकाणी कृत्रिम घरटी (ढोल्या) बसवून तेथील दैनंदिन निरीक्षण करण्याचे काम ही सोसायटी करीत आहे. यासाठी खासगी देवरायासुद्धा भाडेतत्त्वावर घेतल्या जात आहेत. यातून 'दत्तक ढोली' ही संकल्पना पुढे आणून ज्या ठिकाणी धनेश पक्ष्याची ढोली आहे, ती ढोली जपण्याचे काम परिसरातील राहणाऱ्या लोकांकडे सोपवून त्यांना त्यासाठी काही मानधन दिले जाणार आहे. काही ठिकाणी बचत गटांच्या मदतीने ढोल्या वाचविण्यात काम करण्यात येत आहे. मात्र यासाठी लाखो रुपये खर्च असल्याने सोसायटीला आर्थिक मदतीची गरज आहे. 'धनेश मित्र निसर्ग मंडळा'ची स्थापना धनेशच्या संवर्धनातून मोठ्या प्रमाणावर जंगलांचे पुनर्निर्माण होणार असल्याने धनेश खाद्या झाडांची रोपवाटिका, खाद्या झाडांचे पुनर्रोपण, अधिवास पुनर्निर्मिती, कृत्रिम घरट्यांचा वापर आणि जागृती यातून धनेश संवर्धनाला सुरुवात झाली आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील धनेश मित्र निसर्ग मंडळाच्या माध्यमातून धनेश संवर्धनाची लोक चळवळ उभी करण्यात येत आहे. सह्याद्रीच्या पायथ्याशी असणारी २० गावांचा, शाळा, महाविद्यालयात धनेश मित्र निसर्गची स्थापना करण्यात आली आहे. देवरुख येथे पहिले धनेश मित्र संमेलन घेऊन 'सह्याद्री संकल्प सोसायटी'ने धनेश आणि जंगल देवराया संवर्धनाची मोहीम हाती घेतली आहे. संस्थेचे इतर उपक्रम 'सह्याद्री संकल्प सोसायटी'ने धनेश आणि जंगल संवर्धनाबरोबर इतर काही महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. त्यामध्ये शाश्वत शेतीचा समावेश आहे. कोकणातील जंगलांना लागणारे वणवे कमी करता यावेत आणि राब काढण्यासाठी होणारी, वृक्षतोड थांबवण्यासाठी आदिम बियाणी आणि सेंद्रिय शेती प्रकल्प राबवला जात आहे. स्थानिक शेत जमिनीवर भात बियाणे नाचणीची लागवड करून सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून भाजावळ मुक्त शेतीचे प्रयोग केले जात आहे. याबरोबर रान कुत्रे यांच्या हालचाली टिपणे आणि त्यांच्या प्रजाती शोधणे हेदेखील काम हाती घेण्यात आले आहे. तथाकथित आधुनिक विकासाच्या वेळाने झपाटलेले राज्यकर्ते आणि आपल्या भावी पिढ्यांच्या भरभराटीची स्वप्न पाहणाऱ्या सध्याच्या समाजामुळे हवामान बदल निसर्ग आणि पर्यावरणाची हानी इत्यादी बाबींकडे सरसकट डोळे झाक केली जात आहे. पण हीच वृत्ती भावी पिढ्यांच्या मुळावर येण्याचा धोका आहे. त्यावर मात करण्यासाठी आपल्याला फार काही करता येणे शक्य नसेल तर किमान त्यासाठी काम करणाऱ्या 'सह्याद्री संकल्प' सारख्या सोसायट्यांना बळ देणे, ही आपली व्यक्तिगत आणि सामाजिक जबाबदारी ठरते. आर्थिक साहाय्याची गरज धनेश पक्ष्यांसाठी कृत्रिम ढोल्या बनविण्यासाठी तसेच त्यांचे दैनंदिन निरीक्षण करण्यासाठी कॅमेरा आणि अन्य साहित्यांची मोठ्या प्रमाणात गरज आहे. त्याचे नियोजन करण्यासाठी आर्थिक मदतीची गरज आहे. देवराया वाचवणे व जंगल संवर्धनासाठी धनेश पक्ष्याच्या प्रजाती वाचवणे गरजेचे आहे. त्यांच्या देखभालीसाठी ४० ते ५० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्याबरोबर धनेशाच्या विष्ठेपासून मिळणाऱ्या बिया त्यांची रोपे तयार होण्यासाठी रोपवाटिकेचा विस्तार करायचा आहे. त्यासाठीही पैशांची गरज आहे.




# हंबरडा- कथा माय लेकरांची

आपल्या मायसाठी लेकरांनी जोराचा हंबरडा फोडलेला पाहून दगडालाही पाझर फुटून झऱ्यांना जागा मिळावी तसा अनेकांनी अश्रूंना बांध मोकळा करून दिला. ज्यांच्या डोळ्यांच्या कडा पाणवल्या नसतील तो तिथे आभाववानेच असावा.

अशा दुःखी, कष्टी वातावरणात मायच्या अंतयात्रेच्या तयारीला सुरुवात झाली. अंत्ययात्रेत सहभागी होण्यासाठी येणाऱ्या गर्दीला पाहून अनेकांनी आश्चर्य व्यक्त केलं. आमच्या हयातीत या गाव-खेड्यात एवढी गर्दी आमच्या पाहण्यात आलीच नाही. अशी अबालवृद्धांमध्ये चर्चा सुरू झाली. ती चर्चा फक्त गर्दीपूर्ती मर्यादित कधीच नसते, तर त्यामध्ये कुटुंबासह मुलाबाळांच्या भल्याबुऱ्या कार्यकर्तृत्वाचा इतिहास उजागर होत असतो. समर्थकांसह विरोधकांनाही साधक-बाधक चर्वणचर्चेला मिळालेली ती एक संधी असते. असे असले तरी त्यामध्ये सत्याला बराच वाव असतो.

आधीच बापाचं छत्र हरवलेली लेकरं आता मात्र मायच्या प्रेमालाही पारखी झाली. सैरभैर होऊन वासराची गाय हरवल्यागत हंबरत होती. मायच्या कलेवरा भोवती फेर धरून बसल्यावर जणू काय माय एकदा तरी आपल्या सोबत बोलणार की काय? अशा भाबड्या आशेने मायच्या शांत आणि निस्तेज चेहऱ्याकडे ती सारखी एकटक बघत होती. अख्खी हयात ज्या मायने लेकराच्या काळजीत घालवताना त्यांच्या चेहऱ्यावर संकटाची झालर जरी दिसली तरी माय हत्तीनी सारखी आक्रोश करायची. कोणी लेकराच्या वाटेला गेलं, तरी ती वाघिणीसारखी डरकाळी फोडायची. तीच आज शांत पहुडली होती. तिच्या चेहऱ्याच्या भावछटा पूर्णपणे हरवल्या होत्या. तिला आज लेकराचं आक्रन्दन, विव्हळणं दिसत नव्हत. तिला लेकराच्या मनाची घालमेल जाणवत नव्हती. कारण ती प्रकृतीला समरस होऊन तिच्या स्कंधांनी तिची साथ सोडली होती. जीवनाचं शेवटचं सत्य म्हणजे मृत्यू! त्याला ती आज एकरूप झाली होती. तिच्या शांत चेहऱ्याकडे पाहून लेकरं आणखीच हमसून हमसून रडत होती. कधी कधी हळूच एकमेकांकडे नजर टाकून आता आपण कुणाच्या पंखाखाली उब घ्यावी? म्हणून नजरेनेच एकमेकांना प्रश्न करत होती. आपली माय आता आपल्याला कधीही न दिसण्यासाठी कायमची प्रेमाला पारखं करून गेली, ही त्यांची समज पक्की झाली होती. तरीही त्यांचं मन ते मान्य करायला तयार होत नव्हतं. कारण मायच्या मायेने त्यांचं मन तृप्त झालेलं नव्हतं. वयाच्या चाळीसीनंतर जन्मलेल्या लेकरांना अल्प वयातच मायबापांनी पोरकं करून सोडलं होतं.

उतार वयात जन्माला घातलेल्या लेकरांना मोठं करणं त्यांना शिक्षण देणं त्यांच्या आवाक्या बाहेरचं असतानाही, त्यांनी कधीच कच खाल्ली नाही. कधी कुणापुढे हात पसरून स्वाभिमान गहाण ठेवला नाही. मिळेल ती मोलमजुरी करून मुलांना शिक्षणच नव्हे, तर संस्कारातही अव्वल ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. वयानुरूप बापाकडून कष्टाची कामं होत नव्हती, म्हणून शेतातील, महिलांसोबत, उपलब्ध असलेली कोणतीही हलकी सलकी कामं करताना त्याला कधीच कमीपणा वाटला नाही. माय मात्र स्वतःच काम भरभर उरकून बापाच्या कामालाही हात लावायची. उन्हाळ्याच्या दिवसात कामाची कमतरता असली तरी विटा थापण्याचं कष्टाचं काम असायचं. तिथेही त्यांच्या कुवतीनुसार इतरांच्या मानाने अर्ध्याच्यावर काम त्यांच्याकडून होत नव्हतं.

एक बर झालं त्यांची श्रमशक्ती पूर्णपणे असक्षम होण्याआधीच मुलं थोडीफार कमावती झाली. त्यामुळे मायबापाला मोलमजुरी करण्याची गरज राहिली नाही. परिणामी जगणं थोडं सुसह्य झालं. तो त्यांच्या दीर्घायुष्याचा वळणबिंदू ठरला. अन्यथा गावखेड्यात असंही पाहायला मिळते की, पैसा आणि ज्ञानाअभावी, साध्या-सुध्या आजारानेही अनेकांना जीवाला मुकावं लागते.

मुलांचं कमावत होऊन समाजात प्रतिष्ठापूर्ण जीवन व्यतीत करण्यामुळे माय-बापाच्या कष्टासह संस्काराचही चीज झाल्याचं अनेकांच्या तोंडी येऊ लागलं. अन्यथा उतार वयात लेकरं जन्माला घालून त्यांच्या पालन पोषणार्थ जिवाचा आटापिटा केल्यामुळेच जीवनाचं मातेरं झालं; म्हणून मृत्यूही आता सुखाने येणार नाही, असं शल्य आयुष्याच्या शेवटीही अनेकांना बोचत राहतं.

प्रगतीचे पाऊल पुढे सरकते न सरकते तोच रात्रंदिवस कष्टात राबणाऱ्या शरीराचे काबाडकष्ट कमी झाल्यामुळे त्यांना वृद्धापकाळाने घेरलं. परिणामी त्यांच्या काही जुन्या आजारांनी उचल खाल्ली. बापाचा दमा एवढा वाढला की, त्याला खाजगी रुग्णालयात भरती करून सतत सहा महिने कृत्रिम श्वासावर जगवावं लागलं. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार त्यांना कृत्रिम श्वास दिला नाही, तर ते लगेच इहलोकीचा निरोप घेतील. तर काही नातेवाईकांच्या मते पैसा, वेळ, श्रम खर्ची घातल्यापेक्षा त्यांना निरोप देण्यास हरकत नाही. परंतु तरीही लेकरांनी त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपून दोन वर्षाचं आयुष्य प्रदान केलं.

इकडे मायला चिकनगुनियानंतर कायमचा संधिवात जडला. वाताचे अनेक प्रकार असतात, तो कधीच बरा होत नाही. त्या रुग्णाला खूप काळजी घेणे गरजेचे असते, जीभेला थोडं सांभाळावं लागतं. वावडं किंवा अपथ्य खाण्याची काळजी घ्यावी लागते. अशी एक ना अनेक सल्ले जाणकारांकडून मिळत होते. असं असतानाही लेकरांनी तिला ऍलोपॅथी, होमिओपॅथी, आयुर्वेदिक तथा गावठी उपचारांसह यथाशक्ती सर्व औषधोपचार केले. परंतु मायचं दुखणं थांबत नव्हतं. काही गोळ्यांनी तिला बरं वाटत होतं पण त्या बंद करताच दुखणं असह्य होत होतं.

लेकरांनी अनेक डॉक्टर फेरले. एक डॉक्टर तर ८० वर्षांचा वृद्ध दोन्ही डोळ्यांनी अंध होता. परंतु कसब मात्र वाखाणण्याजोगं! सर्व औषध त्यांच्या जवळचेच असायचे. स्पर्श ज्ञानाने गोळ्या देणे, पैसे घेणे, नोटेची चाचपणी करून सुट्टे पैसे परत करणे, याला तोड नाही. आराम बऱ्यापैकी मिळाला परंतु एका मित्राने घरी येऊन सहज गोळ्यांकडे नजर टाकली. आणि सांगितलं यातील एक गोडी स्टेरॉईड आहे. त्यामुळे मायच्या किडन्या निकामी होऊ शकतात. अंगावरील सूज व जीवघेण्या वेदना पाहून मायच्या काही शारीरिक तपासण्या करायचं ठरलं. आणि जे व्हायचं नव्हतं तेच झालं. डॉक्टरांनी लेकरांना सत्य सांगितल्यामुळे त्यांच्या पायाखालची वाळू सरकली. सात गेले आणि पाचच राहिले. सर्वांचं अवसान गळालं. डोळ्यासमोर दिवसा अंधार पसरला. आता आपलं कसं होणार? या विचाराने कुणातच त्राण उरला नाही. या आजारात आयुष्य वाढवता येत असलं तरी कायमचं वाचवता येत नाही, याबद्दल लेकरांनी ऐकलं होतं. तरीही शर्थीचे प्रयत्न सुरू झाले. निष्णात डॉक्टरांचा सल्ला आणि तेवढीच महागडी औषध. ते सर्व पाहून म्हातारीला पेन्शन मिळते की काय? अशी अनेकांनी विचारणा केली. इकडे तर आयुष्यभर एका सांजीचं जेवण दुरापास्त, तेथे पेन्शन कुठलं!

शेवटी दोन वर्षांनी मायच्या शरीराचा प्रतिसाद कमजोर होत गेला. अखेरच्या घटका मोजत असताना पुन्हा शर्थीचे अयशस्वी प्रयत्न केले गेले. परंतु सर्व निरर्थक!

हा संपूर्ण इतिहास लेकरांच्या डोळ्यासमोरुन जात असताना अंत्ययात्रीची वेळ जवळ आली. गावात माणसांसह वाहनांची तोबा गर्दी झाली. वेळ सायंकाळची व दिवसही पावसाळ्याचे होते. आभाळ अधून मधून मायची कथा आणि लेकरांच्या व्यथा पाहत असावे. तिच्या दुःखी-कष्टी जीवनाचा साक्षीदार असणाऱ्या सूर्यानेही आज तोंड लपवलं होतं, तर पावसानेही थोडी उसंत घेतली होती. मायची शेवटची आंघोळ घालून अखेरच्या अंत्यदर्शनासाठी तिला खुर्चीवर टेकवण्यात आलं. लेकरं मायचं अंतदर्शन घेताना तिच्या पायाचे चुंबन घेऊन धाय मोकेलत होती. लेकिनं तर रडताना संपूर्ण इतिहासच उजागर केला. ज्यामुळे प्रत्येकाचं काळीज गहिवरून येत होतं. पाऊस जरी थांबला होता तरी अश्रूधारांनी अंगण भिजल्यागत झालं होतं. अशातच अंतयात्रा निघण्याची वेळ होताच ज्याप्रमाणे आकाशात अचानक काळ्याकुट्ट ढगांची गर्दी होऊन गडगडाटासह मुसळधार पावसाला सुरुवात व्हावी त्याप्रमाणे पाठच्या बहिणी, पोटची लेकरं आणि अजान नातवंडांनी पुन्हा एक शेवटचा हंबरडा फोडला आणि प्रत्येकाने दीर्घ श्वास घेत; अश्रूंना बांध मोकळा करून दिला......

**************

भिमराव परघरमोल
व्याख्याता तथा अभ्यासक
फुले शाहू आंबेडकरी विचारधारा
तेल्हारा जि. अकोला
मो. ९६०४०५६१०४

## बार्टी सयुक्त भा.बौ.म.सुर्यपुत्र भैय्यासाहेब यंशवत आंबेडकर यांच्या स्मृती दिन साजरा करण्यात आला.



वसमत: डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था प्रकल्प अधिकारी सिध्दार्थ गोवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समतादूत आळणे मिलिंद. रघुपती सरोदे सचिव साहेबराव सदर सरोदे सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध डॉ .बाबासाहेब आंबेडकर भैय्यासाहेब यशवंतराव आंबेडकर प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रम अध्यक्षस्थानी डॉ मुळे हे होते प्रमुख पाहुणे मेजर सुर्यतळ साहेब समतादूत मिलिंद आळणे रघुपती सरोदे साहेबराव सरोदे हे होते. यशवंतराव भीमराव आंबेडकर यांनी सिमेंटचा कारखाना काढला त्यानंतर मुंबई विमानतळाच्या परिसरात बांधकाम करणे हा नवीन उद्योग सुरू केला .आणि त्यांनी कोणालाच वाटेकरी घेतले नाही हा व्यवसाय सुरळीतपणे चालला होता यशवंतरावांनी नंतर बाबासाहेबांच्या चळवळीत भाग घेतला त्यानंतर त्यांनी भारत भूषण प्रिंटिंग प्रेस हा छापखाना सुरू केला पुढे ह्या प्रेसचे बुद्धभूषण प्रिटींग प्रेस असे नाव झाले १९४४ पासून बाबासाहेबांच्या जनता प्रबुद्ध भारत या मुखपत्राचे व्यवस्थापन तेच पाहत होते बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस मध्ये बाबासाहेबांच्या थॉट्स ऑन पाकिस्तान हा इंग्रजी ग्रंथ भैय्यासाहेबांनी छापला होता .बाबासाहेबांनी हा ग्रंथ भैय्यासाहेब व मुकुंदराव यांना अर्पण केला होता केला आहे आणि भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने त्यांनी वा .गो.आपटे लिखित बौद्ध पर्व हा ग्रंथ ही आपल्या छापखान्यात छापून प्रसिद्ध केला.आभार प्रदर्शन साहेबराव सरोदे यांनी केले यादव चौरे, काळे साहेब, पंडीत पत्रकार मोठ्या संख्येने उपासक उपासिका उपस्थित होते

## जास्त प्रमाणात त्रिफळाचे सेवन करणे आरोग्यासाठी फायदेशीर की घातक? जाणून घ्या तज्ज्ञांचे मत..

आवळा, हरड यांप्रमाणेच त्रिफळादेखील एक प्राचीन आयुर्वेदिक उपचार आहे; जो सध्या अनेक समस्यांवर रामबाण उपाय म्हणून वापरला जात आहे. अनेक आजारांवर फायदेशीर, तसेच बद्धकोष्ठतेवर उपचार करण्यापासून ते वजन कमी करण्यापर्यंत आणि दातांच्या समस्या सोडविण्यासाठीही सर्वत्र याचा वापर केला जातो. त्रिफळा सूज कमी करण्यासाठीही फायदेशीर आहे. तसेच काही प्रयोगशाळांमधील अभ्यासानुसार, त्रिफळा कर्करोगांपासून संरक्षण करू शकतो. परंतु, त्रिफळा अनेक समस्यांवर उपाय असूनही या औषधाचे काही दुष्परिणामदेखील होऊ शकतात. त्रिफळा खाणारे अनेक जण केवळ त्याचे फायदेच पाहतात आणि त्याच्या संभाव्य दुष्परिणामांकडे दुर्लक्ष करतात. त्रिफळाचे उपचार सुरू करण्यापूर्वी त्याचे चांगले किंवा वाईट असे सर्व परिणाम जाणून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कनिक्का मल्होत्रा (सल्लागार, आहारतज्ज्ञ व मधुमेह शिक्षक) यांनी 'दी इंडियन एक्स्प्रेस.कॉम'ला त्रिफळाच्या काही दुष्परिणामांची माहिती दिली आहे. आतड्यांवरील परिणाम होऊ शकतो कनिका यांच्या मते, त्रिफळाच्या वापराचे तुमच्या आतड्यावर बरेच संभाव्य दुष्परिणाम होऊ शकतात. जास्त प्रमाणात त्रिफळाचे सेवन केल्याने त्याच्या नैसर्गिक रेचक प्रभावामुळे अतिसार आणि ओटीपोटात दुखण्याचा त्रास होऊ शकतो. तसेच रिकाम्या पोटी त्रिफळाचे सेवन केल्याने पोटासंबंधीच्या समस्या निर्माण होण्याचा धोका वाढू शकतो, असे कनिक्का यांनी सांगितले. त्यांनी पुढे हेही स्पष्ट केले की, त्रिफळाचे अधिक सेवन करण्यापूर्वी एखाद्या तज्ज्ञाचा सल्ला घेणे आवश्यक आहे


## महाराष्ट्र मच्छीमार विकास संघ मुंबईच्या वतीने लालबागचा राजाचे सामूहिक दर्शन



नवी मुंबई / के.एच. हनवते :- महाराष्ट्र मच्छिमार विकास संघ मुंबई च्या वतीने लालबागचा राजा दर्शन सोहळा सर्व मुंबईमधील कोळी मच्छीमार बांधवांसाठी उपलब्ध करण्यात अला होता या कार्यक्रमाला खासदार व मुंबई काँग्रेस अध्यक्ष प्रा. वर्षाताई गायकवाड यांचे विशेष सहकार्य लाभले. आयोजक मुंबई अध्यक्ष डॉ. सनी शंकर वालिका व श्री किरण भाऊ सुंदरलाल निजाई यांच्या नियोजन व पुढाकाराने हे ३ वर्ष, आनंदात व उत्साहात दर्शन सोहळा पार पडला मुंबई मधील कोळी महिला बांधव पारंपारिक वेशभूषा मध्ये उपस्थित होते. टिमकी बाजा हा पारंपारिक कोळी बाजा श्री. संदेश मुरुडकर मंडळी यांनी अतिशय जल्लोषाचा वातावरण राजाच्या दरबारी तयार केला लालबागच्या राजाला सन बोर्ड ने बनवलेला पापलेट मासे चा हार कोळी बांधवांच्या वतीने अर्पण करून मनोभावी पूजा अर्चना केली. या कार्यक्रमाला आमचे आराध्य दैवत, मुंबईचे मुंबादेवी, आई एकविरा माऊली, श्री गौरी माता, श्री मल्हार देव यांचे मोठे फलक घेऊन सगळे कोळी लोकांनी दर्शन घेतले लालबाग मंडळाचे अध्यक्ष श्री बाळासाहेब कांबळे यांनी आयोजक डॉ. सनी वालीका यांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यामागे सगळे कोळी बांधवांचा व भगिनींचा मोठा वाटा आहे यावेळी मच्छीमार संघाचे पदाधिकारी श्री. सुदत्ता खरात, दिनेश जाधव, प्रतीक ओहळ, दीपक पटेल, विलास सकपाळ, अक्षय मांद्रे, अशोक गरुड, सागर वालिका, महेश कोळी, नवनीत वैती उपस्थित होते.. महिला पदाधिकाऱ्यांमध्ये स्नेहा पवार, दिपाली कोळी, वनिता तांडेल, जाई सावंत, उज्वला सकपाळ, सुनिता बनसोडे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाला इन्स्टाग्राम इन्फ्लुयेन्सर साक्षी मुंबईकर व आदी भावर संघाच्या विनंतीला मान देऊन उपस्थित राहिले व सर्व लोकांसोबत राजाच्या दरबारी आनंद उत्सव मध्ये शामिल झाले लालबागचा राजाचा विजय असोने सारा परिसर भक्तिमय झाला होता.

## एक्स-रे मशीन बंद असल्यामुळे नागरिकांना जावा लागतो बाहेर,

### गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात सुविधांचा अभाव



किनवट/शेख शौकत तेलंगणा राज्य आणि महाराष्ट्राच्या सीमेवर असलेला मराठवाड्यातील शेवटच्या टोकावरचा किनवट तालुका हा आदिवासी व अतिदुर्गम नक्षलग्रस्त किनवट तालुका म्हणून ओळखला जातो आहे. त्यामुळे या भागातील लोकांना वैद्यकीय सुविधेसाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते आहे. किनवट तालुक्यात १३४ ग्रामपंचायत, १६९ वाडी वस्ती, तांडे अशी एकूण २९३ गावे आहेत किनवट शहर, गोकुंदा मोठी ग्रामपंचायत आणि विदर्भाच्या उमरखेड तालुक्यातील अनेक गावे तातडीच्या सेवेसाठी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येतात तरी नागरिकाच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते . त्यामुळे किनवट तालुक्यातील जनतेला आरोग्याच्या दर्जेदार सोई सुविधा मिळाव्या म्हणून शासनाकडे लाखो रुपये खर्च करून उप जिल्हा रुग्णालयात उपचार घेण्यासाठी व आम जनतेचे सुविधांसाठी सिटीस्कॅन, डायलेलीस युनिट, एक्स-रे मशीन बसवले परंतु गेल्या अनेक दिवसापासून एक्स-रे मशीन बंद असल्यामुळे गोर गरीब रुग्णालया पासून बाहेर जाऊन पैसे देऊन एक्स-रे काढुन आणावे लागते पेशंटचे वेळ व पैसे बिना कारण खर्च होत आहे. त्यामुळे लवकरात लवकर शासनानि लक्ष देऊन मशीन दुरुस्ति करून नागरिकाची सोयी सुविधा मिळवून द्यावी अशी नागरिकांकडून मागणी होत आहे.

## मनपाच्या कलशात आठ क्विंटल निर्माल्याचे दान!

### १३ हजार गणेश मूर्तींचेही संकलन



लातूर/प्रतिनिधी:जल प्रदूषण टाळण्यासाठी मनपाच्या वतीने राबविण्यात आलेल्या गणेश मूर्ती संकलन उपक्रमा अंतर्गत शहरातून जवळपास १३ हजार गणेश मूर्ती संकलित करण्यात आल्या.या सोबतच यंदा निर्माल्य संकलनासाठी पालिकेने ठेवलेल्या कलशामध्ये गणेशभक्तांनी आठ क्विंटल निर्माल्याचे दान केले.या निर्माल्यापासून खत निर्मिती केली जाणार आहे.

परंपरेप्रमाणे गणेश मूर्तींचे जलाशयात विसर्जन केले जाते. मूर्तीसोबत निर्माल्यही पाण्यात टाकले जाते. यामुळे जलस्त्रोत प्रदूषित होतात.ते टाळण्यासाठी मनपा घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळाकडूनही मूर्ती संकलित करते.या सर्व मूर्तींचे नंतर बारा नंबर पाटी परिसरातील खाणी मध्ये विधिवत विसर्जन केले जाते.

या उपक्रमा अंतर्गत पालिकेने यावर्षी शहरात १५ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्रे उभारली होती. त्यासाठी जवळपास ४०० अधिकारी व कर्मचारी नियुक्त केले होते.या केंद्रावर गणेश मूर्तींचे संकलन करण्यात आले. मूर्ती सोबतच भक्तांना निर्माल्य टाकता यावे यासाठी कलशही ठेवण्यात आले होते.या कलशांमध्ये ८०० किलो निर्माल्य संकलित झाले.

पालिकेने नांदेड रस्त्यावरील यशवंत शाळेत उभारलेल्या संकलन केंद्रात २१६ मूर्तींचे संकलन झाले. विवेकानंद चौकातील पाण्याची टाकी परिसरात २२९,मंठाळे नगर मधील मनपा शाळा क्रमांक नऊ मध्ये ५५२ घरगुती व सार्वजनिक मंडळांच्या २ मुर्ती,सिद्धेश्वर मंदिर परिसरात १७२० घरगुती व १५ सार्वजनिक मंडळांच्या मूर्ती संकलित करण्यात आल्या. जिल्हाधिकारी कार्यालया जवळील शासकीय विहीर परिसरात ३६५,बार्शी रस्त्यावरील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या पाण्याच्या टाकीच्या परिसरात ११७४ घरगुती व मंडळांच्या ४ मुर्ती तसेच दयानंद महाविद्यालयाच्या पार्किंग परिसरात ४६० घरगुती व २ मंडळाच्या भक्तांनी मूर्ती मनपाच्या कर्मचाऱ्यांकडे सुपूर्द केल्या.सरस्वती कॉलनीतील पाण्याची टाकी परिसरात एका मंडळाने व ९७५ नागरिकांनी तर टाऊन हॉल परिसरात घरातील ६४४ आणि मंडळांच्या ६ मुर्ती जमा झाल्या. बांधकाम भवन येथे घरगुती २३३७ व सार्वजनिक मंडळांच्या ५९ ,कव्हा रस्त्यावर खंदाडे नगरमध्ये घरगुती २५०३ घरगुती व सार्वजनिक २० मुर्ती जमा झाल्या.साळे गल्लीतील यशवंत शाळा २७९ नागरिकांनी आणि तिवारी यांच्या विहिरीजवळ ७३३ घरगुती व ६ सार्वजनिक गणेश मूर्ती संकलित झाल्या.गणेश नगर येथे २२२ घरगुती व काशी विश्वेश्वर मंदिराच्या ग्रीन बेल्ट मध्ये ३६७ मुर्ती भक्तांनी मनपा कर्मचाऱ्यांकडे आणून दिल्या. सार्वजनिक गणेश मंडळांच्याही मूर्ती मनपाकडे देण्यात आल्या. एकूण १२ हजार ७७६ गणेश मूर्तींचे संकलन यावर्षी मनपाच्या वतीने करण्यात आले.

निर्माल्य संकलनासाठी ठेवलेल्या कलशात जमा झालेल्या निर्माल्यापासून मनपा खत तयार करणार आहे.शहरातील गणेश भक्तांनी मनपाच्या आवाहनाला प्रतिसाद देत आपल्या घरातील गणेश मूर्ती संकलन केंद्रात जमा केल्या.याबद्दल मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी शहरातील नागरिक व सार्वजनिक गणेश मंडळाचे आभार मानले आहेत.

## एमआयटी यशवंतराव चव्हाण रुग्णालयात मातृवंदन सेवा मोफत योजनेचा शुभारंभ



लातूर :- लातूर येथील एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात त्यागमूर्ती प्रयागाआक्का कराड मातृवंदन सेवा योजना नव्याने सुरू करण्यात आली असून या योजनेचा शुभारंभ लातूर एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने करण्यात आला. सदरील योजनेमुळे महिला प्रसुती व त्यासंबंधीच्या शस्त्रक्रिया मोफत होणार आहेत.

ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्य निरोगी असावे यासाठी सातत्याने लातूर एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबवले जातात. एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांच्या सूचनेनुसार त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड मातृवंदन सेवा ही योजना नव्याने सुरू केली असून या योजनेच्या माध्यमातून महिलांच्या प्रसुती आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या शस्त्रक्रिया मोफत केल्या जाणार आहेत.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड मातृवंदन सेवा योजनेचा शुभारंभ रविवारी एमआयटी परिसर समन्वयक पृथ्वीराज रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठता डॉ. बस्वराज नागोबा, प्रशासकीय व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, रुग्णालय अधीक्षक डॉ. माले, स्त्रीरोग विभाग प्रमुख प्रा. डॉ. क्रांती केंद्रे, प्रा. डॉ. चंद्रकला डावळे, डॉ. लिला खटोड, डॉ. रोशनी आकूसकर, डॉ. प्रिती, डॉ. आबेद नागुरे, डॉ. माहे दरक्षण, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, श्रीपती मुंडे, श्री. हत्ते यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रसुती विभाग आणि स्त्री रोग विभागाची परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड यांनी पाहणी करून समाधान व्यक्त केले व महिला रुग्णांच्या सुविधेबाबत महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

## बांधावर बेकायदा रस्ता ;दोनदाही खोटे पंचनामे वैतागलेल्या शेतकर्यांचे आमरण उपोषण सुरु!




लातूर : - मुरुड अकोला येथील अल्पभूधारक शेतकरी धनराज कुंडलिक शेंडगे यांच्या शेतीच्या बांधावर बेकायदेशीर नव्यानेच रस्ता करुन आपले नुकसान केले आणि तहसीलकडून दोन वेळा ही खोटे पंचनामे केल्याचा आरोप करुन,वैतागलेल्या शेंडगे यांनी दि.१७ सप्टेंबर पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला सुरवात केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,मुरुड अकोला येथील गट नं.२१२ मध्ये धनराज कुंडलिक शेंडगे या अल्पभूधारक शेतकर्याची जमीन आहे.त्यांच्या बाजूच्या गट नं.२१५ व २१४ मधील शासकीय गायरान जमिनीवर एकाने अतिक्रमण करत पूर्वी कुठेच खरेदीखत,मोजणी नकाशा,टोच नकाशा,गावनकाशामध्ये नोंद नसतानाही शेजार्याने दि.३० नोव्हेंबर व ७ डिसेंबर २०२३ रोजी नाला तोडून नवीनच रस्ता केला नंतर आपल्या बांधाला दमदाटीने जोडून अतिक्रमण करुन रस्ता वहिवाट पाडण्याचे कृत्य केले.याबाबत जिल्हाधिकारी,उपविभागीय अधिकारी,तहसील,लातूर यांना वेळोवेळी निवेदने दिली.जिल्हाधिकारी लोकशाही दिनांत न्याय मागितला.

त्यावर वरिष्ठांच्या आदेशानंतर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने गातेगाव मंडळअधिकारी,नायबतहसीलदार महसूल -२ यांनी जागेवर येवून पंचनामे केले पण नाला बुजविल्याचा,बांधा तोडल्याचा,रुंद केल्याचा,बांधावरची झाडे नष्ट केल्याचा,या अतिक्रमणामुळे आपला बोअर बंद पडल्याचा,डीपी व सर्व्हीस रॅम्पला धोका असल्याचा आदी आर्थिक नुकसानीचा खुबीने उल्लेखच टाळण्यात आल्याचा आरोप करुन शेतकरी शेंडगे यांनी तात्काळ न्यायासाठी सातत्याने सर्व संबंधितांकडे निवेदने देवून कसलाच न्याय मिळाला नाही म्हणून दि.१७ सप्टेंबर २०२४ पासून जिल्हाधिकारी कचेरीसमोर आमरण उपोषणाला सुरुवात केल्याचे तसेच या निवेदनाच्या प्रति महसूल मंत्री, गृहमंत्री,पालकमंत्री आदिंना दिल्याचे कळविले आहे.

## सद्यस्थितीत ज्ञानाशिवाय पर्याय नाही:सोमेश्वर वाघमारे



लातूर :- या देशातल्या बहुसंख्य समाजाला मनुस्मृतीने वर्ण,जातीच्या साच्यात टाकून ज्ञानापासून दूर ठेवले होते,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून सर्वांना विकासाची संधी निर्माण करुन दिली.आपणही देशाचे नागरिक आहोत,या देशाच्या उभारणीत आमचेही योगदान आहे,याची जाणीव निर्माण करुन दिली,असे सांगून आजच्या काळात ज्ञानाशिवाय प्रत्येकाला विशेषतःतरुणांना पर्याय नाही असे प्रतिपादन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणचे माजी शिक्षणाधिकारी ॲड.सोमेश्वर वाघमारे यांनी केले.

सम्राटअशोकसार्वजनिकवाचनालयाच्या स्वातंत्र्य सैनिक नगरातील विस्तारीत वाचकक्षात मंगळवार,दि.१७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना अध्यक्षपदावरुन ते बोलत होते.प्रमुख पाहुणे म्हणून ॲड.सुधाकर अरसुडे होते.मंचावर वैद्यराज तुकाराम रोकडे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी ॲड.वाघमारे व ॲड.अरसुडे यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करुन तिरंगा ध्वजारोहण करुन,सामूहिक राष्ट्रगीत घेण्यात आले,त्यानंतर त्यांचा गुलाबपुष्प व ग्रंथ भेट देवून सत्कार करण्यात आला.

डॉ.आंबेडकरांनी अठरा तास अन्नाशिवाय बसून अभ्यास करुन जगात ज्ञानाचे प्रतिक म्हणून नावलौकिक मिळवला हा आदर्श समोर ठेवून,व्यसनांच्या आहारी न जाता आपल्या अमूल्य जीवनातला वेळ वाया न घालवता ज्ञान संपादन करावे,असे सांगून मराठवाडा मुक्तीसाठी झटलेल्या विभूतींना अभिवादन केले.

फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचाराने गेल्यास आपला वैचारिक पाया भक्कम होतो,ती काळाची गरज आहे.संकटाशिवाय माणूस घडत नाही.ती जणू परीक्षाच असते. ती घडण्याची संधी असते.या ग्रंथालयात स्पर्धा परीक्षेची ठेवलेली ग्रंथसंपदा गरजूंसाठी उपयोगी पडेल अशी अपेक्षा ॲड.अरसुडे यांनी बोलताना व्यक्त केली.वैद्यराज तुकाराम रोकडे यांनीही मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सचिव बी.जी.होळीकर यांनी केले.ग्रंथपाल अंजुषा काटे यांनी आभार मानले.या कार्यक्रमाला लिपीक संकेत होळीकर,वाचक महादेव राऊत,बी. जी.बनसोडे,किशन यमूलवाड,प्रल्हाद गायकवाड,संघर्ष रोकडे,धनराज साडोळे,आत्माराम गिरी,दिपक भारती, अक्षरा कदम,अहजर शेख, जे.एन.माने आदिंची उपस्थिती होती.

## हस्तांदोलनाचा थेट हृदयाशी संबंध! हाताची पकड सांगते हृदय व रक्तवाहिन्यांचे आरोग्य कसे आहे?

हस्तांदोलन ही फक्त अभिवादन करण्याची पद्धत नाही; तर व्यावसायिक क्षेत्रात याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पण, तुम्हाला माहीत आहे का की हस्तांदोलनाचा थेट संबंध आपल्या हृदय व रक्तवाहिन्यांशी येतो. तुम्हाला वाटेल हे कसं शक्य आहे; पण हे खरंय. न्युट्रिशनिस्ट व कन्टेट क्रिएटर दीपशिखा जैन सांगतात, जेव्हा घट्ट हस्तांदोलन केलं जातं तेव्हा हृदय जास्त प्रमाणात रक्ताभिसरण करतं, जो हृदयाचं आरोग्य चांगलं असल्याचा पुरावा आहे. हस्तांदोलन करताना तुमची हाताची पकड कमकुवत असेल, तर तो हृदयाचं आरोग्य खराब असल्याचे संकेत आहे. हे खरं आहे का, हे जाणून घेण्यासाठी दी इंडियन एक्स्प्रेसनं तज्ज्ञांच्या हवाल्यानं याविषयीची माहिती जाणून घेतली. हाताची पकड ही हृदयाच्या आरोग्याशी जोडणारी शारीरिक यंत्रणा आहे. तुमच्या हातातील स्नायू आणि हृदय यांच्यात काय व कसा संबंध आहे, याविषयीची माहिती देताना डॉ. हिरेमठ यांनी सांगितलेल्या बाबी खालीलप्रमाणे :स्नायूंची ताकद आणि हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित फिटनेस : हाताच्या घट्ट पकडीवरून एकूणच स्नायूंच्या ताकदीचा अंदाज लावता येतो. काही अभ्यासांतून असे सूचित करण्यात आले आहे की, हाताची मजबूत पकड असलेल्या लोकांच्या हृदयाची कार्यक्षमता चांगली असते आणि रक्तदाब कमी असतो. तसेच हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आरोग्य उत्तम असते. कारण- मजबूत स्नायूंना ऑक्सिजन आणि पोषक घटक मिळविण्यासाठी हृदय व रक्तवाहिन्या मदत करतात. जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह ताण : हातांची कमकुवत पकड छातीत जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह तणावाशी संबंधित आहे. कारण- या दोन्ही गोष्टींमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो.

एंडोथेलियल कार्य : एंडोथेलियम हा आपल्या रक्तवाहिन्यांवरील एक थर असतो जो हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आरोग्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. हाताची चांगली पकड असणे म्हणजे एंडोथेलियल कार्य चांगले असणे होय. म्हणजेच मजबूत हाताची पकड तुमच्या रक्तवाहिन्या निरोगी असल्याचे दर्शवते.

# उपवर्गीकरणामागे हिंदू दलित व्होट बँक गठित करण्याचे राजकारण..!

## डॉ. सुरेश माने यांचा भाजपवर आरोप

### चर्मकार आमदारांची संख्या घटणार!

महाराष्ट्रातील चर्मकार, मातंग या अनुसूचित जाती उप वर्गीकरणाचे समर्थन, स्वागत करत असल्या तरी त्यांच्यासाठी तो आत्मघात आहे, असे प्रतिपादन चर्मकार नेते अच्युत भोईटे यांनी या परिषदेत बोलताना केले.महाराष्ट्र विधानसभेत २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीसाठी २९ जागा राखीव आहेत, असे सांगून ते म्हणाले की, २९ पैकी चर्मकार समाजाचे सध्या ११ आमदार आहेत. लोकसंख्येच्या १.३ टक्क्याप्रमाणे उप वर्गीकरण झाल्यास त्यांच्या आमदारांची संख्या ३ पर्यंत घसरेल. मातंग समाजाचे सध्या चार आमदार आहेतच. उप वर्गीकरणात लोकसंख्येच्या २.३४ टक्क्याप्रमाणे त्यांचे पाच आमदार होतील. म्हणजे एक मातंग आमदार वाढेल. उर्वरित ५६ जातींचे सध्या सहा आमदार आहेत. त्यात बुरडः २, बलाई :१, खाटीक : १ , वाल्मिकी १, कैकाडी : १ आहे. लोकसंख्येच्या १.५६ टक्क्याप्रमाणे उप वर्गीकरण झाल्यावर त्यांच्या आमदारांची संख्या तीन इतकी होईल.

### बौद्ध उपवर्गीकरणाअभावी तोट्यात!

राज्यात उपवर्गीकरणविरोधी लढ्यात बौद्ध सर्वात आधी मैदानात उतरल्यामुळे त्या समाजाला उपवर्गीकरण मारक असावे, असा इतर अनुसूचित जातींचा समज होवू शकतो. पण प्रत्यक्षात मात्र बौद्ध समाज हा उप वर्गीकरणाअभावी सध्या तोट्यात आहे, याकडे भोईटे यांनी सर्वांचे लक्ष वेधले.पूर्वाश्रमीच्या महार म्हणजे बौद्ध समाजाचे सध्या फक्त ८ आमदार आहेत. लोकसंख्येच्या ७.८ टक्क्याप्रमाणे त्या समाजाचा १७ आमदारांचा सर्वात मोठा वाटा उप वर्गीकरणानंतर निश्चित होईल, असे भोईटे यांनी यावेळी सांगितले.आरक्षण तिसऱ्या पिढीला नको : डॉ. मुणगेकर मुळात अनुसूचित जातींना क्रीमी लेअर लागू करण्याची तरतूद राज्यघटनेत नाहीच. पण उपवर्गीकरणाच्या निकालानंतर आरक्षणाचा लाभ फक्त एकाच पिढीला देण्याची चर्चा सुरू झाली आहे. त्याचा उल्लेख करून माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर म्हणाले की, आरक्षणाचा लाभ तिसऱ्या पिढीला न देण्याचा विचार करायला हरकत नाही. पण शिरकावासाठी पहिल्या पिढीला आणि स्थैर्यासाठी दुसऱ्या पिढीला आरक्षण आरक्षण राहिले पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

मुंबई / के. एच. हनवते :- लोकसभा निवडणुकीत समस्त नागरिकांना मूलभूत आणि मानवी हक्क – अधिकारांची हमी देणाऱ्या संविधानाच्या अस्तित्वाचा मुद्दा केंद्रस्थानी आला होता. त्याने भाजपला ३०३ जागांवरून २४० जागांवर खाली आणले, असे सांगतानाच अनुसूचित जाती, जमातींचे उप वर्गीकरण करण्यामागे नवी हिंदू दलित व्होट बँक गठित करण्याचे भाजपचे राजकारण आहे, असा आरोप संविधान तज्ज्ञ आणि बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे अध्यक्ष ड. डॉ.सुरेश माने यांनी केला. ते शनिवारी मुंबईत उप वर्गीकरण या विषयावर दलित विचारवंत, कायदेतज्ज्ञ, माजी सनदी अधिकारी, साहित्यिक, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या एका परिषदेत बोलत होते. अंधेरी ( पश्चिम) चार बंगला येथील कर्मवीर दादसाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्रातर्फे अध्यक्ष विजय जाधव आणि सरचिटणीस चंद्रकांत बच्छाव यांनी डॉ. आंबेडकर जन्म शताब्दी भवनात ही परिषद आयोजित केली होती. तब्बल सहा तास चाललेल्या या परिषदेत माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर, साहित्यिक अर्जुन डांगळे, माजी आयपीएस सुधाकर सुराडकर, माजी न्यायाधीश डॉ.डी. के.सोनावणे, ड. जयमंगल धनराज, प्रा.डॉ. एम. के. डेकाटे, प्रा. डॉ. जयराम चव्हाण, चर्मकार नेते अच्युत भोईटे, ज्येष्ठ पत्रकार मधू कांबळे, दिवाकर शेजवळ, चंद्रकांत सोनावणे, प्रशांत रूपवते, ड. किशोर कांबळे आदी मान्यवरांनी आपले विचार मांडले. डॉ. सुरेश माने आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, देशात अनुसूचित जातींची संख्या ११०८ इतकी असून अनुसूचित जमातींची संख्या ६२८ आहे. त्यातून उपवर्गीकरणाची मागणी करणाऱ्या एससी जातींची संख्या १० सुद्धा नाही. तर, एसटीमधील कुठल्याही जातीने तशी मागणी केलेली नाही. असे असतानाही केंद्र



सरकारला त्या जाती – जमातींना अलग अलग करण्याची गरज का भासली आहे ? एससी आणि एसटी यांच्या उप वर्गीकरणापूर्वी केंद्र सरकारने रोहिणी आयोगाच्या माध्यमातून ओबीसींचेही चार तुकडे करण्याची खेळी केली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. दलित, आदिवासी आणि ओबीसी यांच्यावर अधिसत्ता गाजवण्यासाठीच भाजप सरकारने ' फोडा आणि झोडा ' या नीतीचा अवलंब केला आहे, असे प्रतिपादन डॉ. माने यांनी केले. भाजपचे हे फूट पाडण्याचे आणि व्होट बँक गठित करण्याचे राजकारण रस्त्यावर उतरून हाणून पाडता येणार नाही, असे सांगून ते म्हणाले की, उपवर्गीकरणाचे धोके उत्तर भारतातील अनुसूचित जाती, जमातींनी पुरेपूर ओळखले आहेत, हे त्यांनी' भारत बंद ' च्यावेळी दाखवून दिले. मात्र महाराष्ट्रात अनुसूचित जाती, जमातींमध्ये या प्रश्नावर जागृती करण्याची गरज आहे.

# लातूर जिल्ह्यातील मुलींचा हॉकी संघ ठरला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र

## माझं लातूर परिवाराचा संघाला भक्कम आधार



लातूर : लातूर जिल्ह्यातील बिंदगीहाळ या गावातील हनुमान विद्यालयाचा मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला असून नांदेड येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत हा ग्रामीण भागातील संघ विजेता ठरला आहे. विशेष म्हणजे या संघाचे पालकत्व माझं लातूर परिवाराने ७ वर्षांपूर्वी स्वीकारत संघाला भक्कम आधार देण्याचे कार्य केले आहे. लातूर जिल्ह्यातील हॉकी या आपल्या राष्ट्रीय खेळास हनुमान विद्यालयाच्या मुलींच्या संघाने राष्ट्रीय पातळीवर लौकीक मिळवून दिला आहे. ग्रामीण भागातील या संघातील २ खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर तर तब्बल २०० च्या वर खेळाडूंनी राज्यस्तरावर लातूरचे प्रतिनिधित्व केलेले आहे. ग्रामीण भागातील गरीब आणि होतकरू मुली या संघाचे प्रतिनिधित्व करतात. क्रीडासाधनांचा अभाव, मैदान, गणवेश अशा अनेक अडचणींचा सामना करीत या संघाने मिळविलेले यश उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन दिले पाहिजे या उद्देशाने माझं लातूर परिवाराने या संघाचे २०१७ साली पालकत्व घेतले. तत्कालीन जिल्हाधिकारी जी श्रीकांत यांच्या हस्ते १७ सप्टेंबर २०१७ साली या संघातील मुलींना हॉकी स्टिक आणि अभ्यासासाठी वह्या देऊन या उपक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर ही खेळाडूंना इतर क्रीडा साहित्य देत परिवाराने आपली सामाजिक बांधिलकी जपली. १३ सप्टेंबर २०२३ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी या संघाला आपल्या कार्यालयात बोलावून खेळाडूंना मार्गदर्शन केले आणि या संघाला विभागीय स्पर्धेत यशस्वी होण्याचे आवाहन केले. यावेळीही माझं लातूर परिवाराच्या वतीने संघातील सर्व खेळाडूंना अद्यावत आणि उच्च प्रतीच्या हॉकी स्टिक देण्यात आल्या होत्या. याप्रसंगी मुलींनी आम्ही खुप परिश्रम घेऊ आणि नक्की यश मिळवू असे आश्वासन पोलीस अधीक्षक मुंडे आणि माझं लातूर परिवाराला दिले होते. आज ते शब्द या मुलींनी खरे ठरवीत दैदिप्यमान यश मिळविले आहे. ग्रामीण भागातील मुलींनी जिद्द, कठीण सराव आणि कर्तुत्वाने मिळविलेले हे यश इतर खेळाडूंना प्रोत्साहन देत राहील. मात्र शासन स्तरावर अशा होतकरू खेळाडूंना मदतीची गरज आहे. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, शासनाचे क्रीडा, शिक्षण विभाग, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी योग्य दिशेने प्रयत्न केले तर राष्ट्रीय पातळीवर लातूरचा लौकीक वाढल्याशिवाय राहणार नाही हे मात्र निश्चित.

# लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात महिला मेळावे श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी साधला संवाद आमदार धिरज देशमुख यांना साथ देऊन विकासाचा रथ गतीमान करा

### हारवाडी येथे हनुमान मंदिर सभाग्रहाचे लोकअर्पण

रेणापूर तालूक्यातील हारवाडी येथील हनुमान मंदिराचे सभाग्रहाचे लाकअर्पण सोहळा दि. १८ संप्टेंबर रोजी पार पडला. याप्रसंगी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते फित कापून लोकअर्पण करण्यात आले.

लातूर : प्रतिनिधी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाची निर्मिती झाली तेव्हापासून या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व कॉंग्रेस पक्षाकडेच आहे. या मतदारसंघाचे आतापर्यंत जे जे आमदार झाले त्या साजयांनी या मतदार संघाचा सर्वांगिण विकास केला. आमदार धिरज देशमुख यांच्या विकास कामांचा रथ संपूर्ण मतदारसंघात फिरत आहे. विकासाच्या या रथास अधिक गती देण्याकरीता मतदारांनी आमदार धिरज देशमुख यांना पुन:श्च संधी द्यावी, असे प्रतिपादन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले रेणापूर तालुक्यातील पाथरवाडी व भंडारवाडी येथे दि. १७ संप्टेंबर रोजी तर दि. १८ संप्टेंबर रोजी रेणापूर तालुक्यातील हारवाडी, जवळगा, सेलू (खु) येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांना संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी डॉ. सौ. सारीका देशमुख, सुनिता अरळीकर, रेणा सहकारी साखर



कारखान्याचे चेरअमन सर्जेराव मोरे, जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. प्रमोद जाधव, रेणा कारखान्याचे व्हाईस चेअरमन अनंतराव देशमुख, चंद्रचुड चव्हाण, पुजाताई इगे, अनिताताई केंद्रे, धनराज देशमुख आदी प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती. पुढे बोलताना श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या, विकासरत्न विलासराव देशमुख यांनी विकास कामांची घडी बसवेली आहे. विकासाचा एक विचार दिलेला आहे.तोच विचार आणि वसा घेऊन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्वात माजी मंत्री आमदार अमित देशमुख, आमदार धिरज देशमुख प्रामाणिकपणे आपल्या भागाचा सर्वांगीण विकास करीत आहेत. नागरिकांचे प्रश्न सोडविण्याकरीता देशमुख कुटूंबिय सदैव तत्पर आहे. या उलट भाजप सरकारने गेल्या दहा वर्षात अनेक खोटी आश्वासने दिली आहेत. मतदारांची दिशाभूल करीत सत्ता मिळवणे, हाच एकमेव त्यांचा उद्देश ठरत आहे. येणाजया विधानसभेच्या निवडणुकीतही भाजपा आणि सत्ताधारी दिशाभूल करतील त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. तसेच यांच्या खोट्या, फसव्या आणि दिशाभूल करणाजया जाहिरातींना बळी पडू नका, असे आवाहन केले. याप्रसंगी पाथरवाडी, भंडरवाडी येथील महिला सुमित्रा जाधव,भागिरती मदे, उषा सुडे, सुषमा खंदारे, अलका जाधव, सुलभा जाधव, सुमन मोरे, महानंदा सगर, जनाबाई येमले, सिमा जाधव, संगिता घुरमे, शाभो येमले आदी महिलांसह पुरूष मंडळी उपस्थित होती. तर हारवाडी, जवळगा, सेलू(बु) येथील द्रोपदीबाई हारवाडीकर, केरूबाई इंगळे, लक्ष्मीबाई कातपूरे, ससूबाई कांबळे, वर्षा इंगळे, वच्छलाबाई गाडेकर,शितल माने, लक्ष्मीबाई माने, शारदा माने, संगिताबाई माने आदी महिलांसह पुरूष मंडळी यांची उपस्थिती होती.

# मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार संपन्न

### अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन




लातूर/प्रतिनिधी : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती व ब्रिक्स ह्यूमन राइट्स मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. (१७) सप्टेंबर रोजी मुक्ती संग्राम लढ्यातील स्वातंत्र्य सैनिक, वीर माता,वीर पिता, वीर पत्नी यांच्या सत्कार समारंभाचा कार्यक्रम प्रणवश्री मंगलकार्यालय लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदीप पाटील खंडापूरकर (राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती), कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ले. कर्नल शरद कांबळे( सैनिक कल्याण अधिकारी लातूर ) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ३२ वर्षे पाकिस्तातील जेल भोगून आलेल्या देशभरातील देशभक्तांचाही गौरव करण्यात आला.

आमच्या बहाद्दर सैनिकांनी निजामांच्या विरोधात लढा दिला. अनेक स्वातंत्र्यसेनानी या लढ्यामध्ये शहीद झाले. अशा शूरवीरांच्या उपकाराची परतफेड कधीही करू शकत नाहीत असे उद्गार प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी काढले. आमच्यासाठी देवा पेक्षाही मोठे असणारे देशभक्त संपूर्ण देशभरातून लातूर या ठिकाणी आले याचा विशेष आनंद आहे असे ते म्हणाले.अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती विविध विषय घेऊन अनेक वर्षांपासून देशभरात काम करत आहे. देशातील २९ राज्यात संघटनेच्या शाखा असून पूर्ण क्षमतेने या सर्व ठिकाणी संघटनेचे काम चालू आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आजपर्यंत अवैध दारू विक्री, भ्रष्ट कर्मचारी यांच्या विरोधात आवाज उठवला आहे. दारूबंदीसाठी ज्या ज्या ठिकाणी संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले त्या सर्व ठिकाणची दारू बंद झाली आहे,हे संघटनेचे मोठे यश असल्याचे त्यांनी सांगितले. मागच्या काही दिवसांमध्ये ११भ्रष्ट कर्मचाऱ्यांना सापळा रचून अडकवण्यामध्ये संघटनेचे मोठे योगदान असल्याचेही ते म्हणाले.

सध्या देशांमध्ये महिला सुरक्षित नाहीत. सरकारला महिलांच्या सुरक्षित कडे लक्ष द्यायला वेळ नाही. अशा परिस्थितीत महिलांनी सक्षम राहिले पाहिजे. महिलांनी कुणालाही न घाबरता पर्स मध्ये लिपस्टिक,क्रीम न ठेवता मिरचीची पूड ठेवून वाईट नजर बंद करण्याचा सल्लाही त्यांनी महिलांना दिला. राजकारणी माजी सैनिकांकडे सहानुभूतीपूर्वक पाहत नाहीत. वीर जवानांच्या पत्नी आमच्यासाठी सरस्वती पेक्षाही मोठया आहेत. त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी माजी सैनिकातून एक खासदार करण्याची मागणी आम्ही सरकारकडे करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान वीर माता, पिता,पत्नी यांच्यासह पाकिस्तानातील ३२ वर्ष जेल भोगून आलेले कुलदीप कुमार यादव (गुजरात), पंकज कुमार (पंजाब), राम राजा (जम्मू काश्मीर),भारत भूषण (जम्मू काश्मीर), श्रीमती विष्णु देवी (जम्मू काश्मीर ), श्रीमती सुवर्ण देवी (जम्मू काश्मीर), सुरिंदर पाल (पंजाब) सन्मान करण्यात आला. समाजसेवेची ५३ वर्ष पूर्ण केल्याबद्दल प्रदीप पाटील खंडापूरकर यांचा सर्वांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. माझ्यासाठी आजचा हा ऐतिहासिक क्षण असून मी शहीद जवान आणि त्यांच्या पत्नी,आई-वडील यांना शतशः नमन करतो म्हणत ले. कर्नल शरद कांबळे ( सैनिक कल्याण अधिकारी लातूर ) यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल नानजकर (अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती) राष्ट्रीय सरचिटणीस, डॉ. संजय जमदाडे यांनी केले तर मनोज तिगाडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी कविता राय जादा (उत्तर प्रदेश), अनिल मिश्रा (झारखंड ), सुबोध कुमार सिंह (बिहार ), गोपी सिराव (राजस्थान ), पंडित तिडके (महाराष्ट्र ), पवन अग्रवाल (राजस्थान), तेज प्रकाश खासा (पंजाब ), राम बेहरा (ओडिसा ), उल्हास पाटील यांच्यासह देशभरातून देशभक्त, माजी सैनिक व संघटनेचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून चव्हाण परिवाराचे सांत्वन

लातूर :- रेणापूर तालुक्यातील मौजे गरसुळी येथील भाजपाचे कार्यकर्ते नवनाथ चव्हाण यांचे वडील नागोराव श्रीपती चव्हाण यांचे नुकतेच दुःखद निधन झाल्याने त्यांच्या निवासस्थानी जाऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी चव्हाण परिवाराचे सांत्वन केले. गावातील आणि परिसरातील आध्यात्मिक व इतर सार्वजनिक कार्यक्रमात सक्रियपणे सहभाग घेणारे वयोवृद्ध श्रीपती चव्हाण यांचे नुकतेच दुःखद निधन झाले सदरील निधनाची माहिती मिळाल्याने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी गरसूळी येथे जाऊन भाजपाचे कार्यकर्ते नवनाथ चव्हाण आणि त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुकाध्यक्ष अँड दशरथ सरवदे, अध्यात्मिक आघाडीचे ज्ञानोबा भिसे, संगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, पत्रकार रामेश्वर बद्दर, श्रीमंत नागरगोजे यांच्यासह अनेक जण होते.



याप्रसंगी चव्हाण कुटुंबातील मयत नागोराव यांच्या पत्नी, मुलगा नवनाथ चव्हाण, चंद्रकांत चव्हाण, भाऊ भाऊसाहेब चव्हाण उपसरपंच सुधाकर चव्हाण, संतोष चव्हाण, भास्कर चव्हाण, सुरेश चव्हाण, श्रीनिवास चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, अरुण कातळे, शिवराज नरवटे, शरद काळे, दिलीप कातळे, ऋषिकेश चव्हाण यांच्यासह अनेकजण होते.

# भाजपा नेते आ.रमेशआप्पा कराड यांचेकडून गरसुळी येथे काशीराम पाटील यांचे सांत्वन

लातूर :- भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते रेणापूर तालुक्याचे माजी अध्यक्ष काशीराम पाटील यांच्या सुविद्य पत्नी सुशिलाबाई पाटील यांचे नुकतेच निधन झाल्याने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर तालुक्यातील मौजे गरसुळी येथे पाटील परिवाराचे बुधवारी सांत्वन केले.

स्व. सुशिलाबाई काशीराम पाटील या गेल्या काही दिवसापासून आजारी होत्या. दिर्घ आजाराने त्यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांच्या पश्चात पती चार मुले दोन मुली नातू पणतू असा मोठा परिवार आहे. सदर दुःखद घटनेची माहिती मिळाल्याने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बुधवारी गरसुळी येथे जाऊन काशीराम पाटील यांची भेट घेवून अस्थेवाईकपणे चौकशी केली व पाटील परिवाराचे सांत्वन केले. यावेळी आ. कराड यांच्या समवेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, अध्यात्मिक आघाडीचे ज्ञानोबा भिसे, संगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमोडे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, पत्रकार रामेश्वर बद्दर, श्रीमंत नागरगोजे यांच्यासह अनेक जण होते.



काशीराम पाटील यांच्या निवासस्थानी गरसुळी येथील उपसरपंच सुधाकर चव्हाण, रावसाहेब पाटील, दिलीप कातळे, संतोष चव्हाण, भास्कर चव्हाण, विठ्ठल गरड, राजेभाऊ चव्हाण, श्रीराम नरवटे, शरद काळे, अरुण कातळे यांच्यासह अनेकजण होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE